# महाराष्ट्र शासन

## पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, मुंबई

## ई—निविदा रद्द सुचना

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील पोलीस कार्यालये व पोलीस ठाणे इत्यादी ठिकाणी साफसफाईचे काम करणेकरिता ४८ सफाई कामगारांची पदे कंत्राटी पदे भरणेकरिता दोन वर्षाकरिता व्दि लिफाफा पध्दतीने ई—निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदाकारांना निविदा प्रपत्र व विर्निदेष https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्याकरिता तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

निविदा समितीच्या झालेल्या तांत्रिक बैठकीमध्ये ई—निविदा उघडण्यात आल्या. त्यावेळी एकही निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. तथापि, मे. महात्मा फुले मल्टी सर्व्हिसेस, परभणी आणि लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार संस्था यांनी व्हॅट क्लिअरन्स अहवाल सादर न केल्याने त्यांच्या निविदा अपात्र ठरल्या आहेत. मे. डी. एस्. एंटरप्रायझेस यांची निविदा पात्र ठरत असली तरी निविदा/दरपत्रक मार्गदर्शक सुचना मधील तरतुदीनुसार निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी दूसरे निविदाकार नसल्यामुळे नव्याने ई—निविदा प्रक्रीया राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

ठिकाण :— मुंबई
दिनांक :— ८ /३ /२०१७

(अनुप कुमार सिंह)
सह पोलीस उप आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचेकरिता